# जनसंपर्क अधिकारी
मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालय
रामनगर सृष्टी, मिरारोड पुर्व ता. जि. ठाणे
फोन नं. ०२२-२९४५१००१
Mail ID- pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in


स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

प्रेसनोट १३३-२३ दिनांक :- २२/०४/२०२३

## चोरी, घरफोडी चोरी करणाऱ्या आरोपीतांस अटक करुन ०४ गुन्ह्यांची उकल नायगाव पोलीस ठाणे, गुन्हे प्रकटीकरण पथकाची कामगिरी.

नायगाव पोलीस ठाणे हद्दीत दिनांक १८/०३/२०२३ रोजी फिर्यादी नामे सुभाष वसंत बनसोडे, रा. एव्हरसाईन, वसई पुर्व यांनी फिर्याद दिली की, दिनांक १६/०३/२०२३ रोजी रात्रौ २०.०० वाजता ते दिनांक १७/०३/२०२३ रोजी सकाळी ०७.०० वा. चे दरम्यान पोमण, कामण वसई पुर्व या ठिकाणावरुन कंपनीच्या बांधकामाकरीता लागणारे वेगवेगळया कंपनीचे नळ, वायर असे एकुण ०१,२४,३००/- रुपये किंमतीचा मुद्देमाल कोणीतरी अज्ञात चोरट्याने चोरी केला आहे. सदरबाबत फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारीवरुन अज्ञात आरोपी विरुध्द नायगाव पोलीस ठाणेत गुन्हा रजि.नं. I ०२/२०२३ भा.दं.वि.सं. कलम ३८० अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला होता.

सदर गुन्हयाचे तपासाचे अनुषगांने वरिष्ठांनी दिलेल्या सुचना व मार्गदर्शनाप्रमाणे नायगाव पोलीस ठाणेचे गुन्हे प्रकटीकरण पथकातील अधिकारी व अंमलदार यांनी गुप्त बातमीदार व तांत्रिक विश्लेषनाव्दारे प्राप्त माहितीच्या आधारे दोन विधीसंघर्ष बालकांकरवी कौशल्यपुर्ण विचारपुस करुन आरोपीत नामे १) दिपक प्रेमनारायण तिवारी, वय-२४ वर्षे, रा. पटेल वाडी, आयएस हमाला, जे. जे. स्टॉप, हनुमान मंदिराजवळ, मालवणी, मालाड पश्चिम, मुंबई २) गंगा देवीराम घनाल, वय-२० वर्षे, रा. लकीचुहा, जि. कैलाली, देश नेपाळ यांना ताब्यात घेवुन तपास केला असता सदर आरोपीत यांनी विधीसंर्षीत बालकांच्या मदतीने वर नमुद गुन्हा केल्याचे निष्पन्न झाल्याने वर नमुद आरोपीतांना दिनांक १७/०४/२०२३ रोजी अटक करण्यात आली. वर नमुद अटक आरोपीत व विधीसंघर्ष बालक यांच्याकडे अधिक तपास करता त्यांनी नायगाव पोलीस ठाण्याच्या अभिलेखावरील ०४ गुन्हे केल्याचे तपासात निष्पन्न झाल्याने त्यांचेकडुन गुन्हयातील चोरीस गेलेले मोबाईल, इतर मुददेमाल व रोख रक्कम असा **एकुण ०१,९७,२००/- रुपये** किंमतीचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला आहे.

### -:उघडकीस आलेले गुन्हे:-

| अ.क्र. | पोलीस ठाणे | गुन्हा रजि नं व कलम |
|---|---|---|
| १. | नायगाव | I ०२/२०२३ भा.द.वि.सं. कलम ३८०, ३४ प्रमाणे |
| २. | नायगाव | I ११/२०२३ भा.द.वि.सं. कलम ३७९ प्रमाणे |
| ३. | नायगाव | I ४५/२०२३ भा.द.वि.सं. कलम ३८० प्रमाणे |
| ४. | नायगाव | I ४७/२०२३ भा.द.वि.सं. कलम ४५४, ४५७, ३८०,३४ प्रमाणे |

सदरची कामगिरी श्रीमती पौणिमा चौगुले-श्रींगी, पोलीस उप आयुक्त, परिमंडळ २, वसई, श्रीमती पदमजा बडे, सहाय्यक पोलीस आयुक्त, वसई विभाग यांचे मार्गदर्शनाखाली नायगाव पोलीस ठाणेचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री. रमेश भामे, पो.नि श्री. मिलींद साबळे (गुन्हे), गुन्हे प्रकटिकरण शाखेचे स.पो.नि. संतोष सांगवीकर, रोशन देवरे, पो.हवा. श्रीकांत पाटील, दत्तात्रय मुंडे, पो.अंम. सचिन मोहीते, सचिन खताळ, जयवंत खंडवी,अमर पवार, चेतन ठाकरे,अशोक पाटील यांनी केली आहे.

------oooo------